**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १७/२०१५-१६/११२ दिनांकः २५-०८-२०१६

**आदेश**
**आदेश केस क्र. १७/२०१५-२०१६**

| | |
|---|---|
| मे. शाहूराजे मागासवर्गीय औद्योगिक सह.संस्था<br>गट क्र. २८६ माणगाववाडी , तिळवणी ता. हातकणंगले<br>जिल्हा कोल्हापूर. | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>कोल्हापूर मंडल कार्यालय, कोल्हापूर<br><br>२) अधीक्षक अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>कोल्हापूर मंडल कार्यालय, कोल्हापूर | **विरुध्द पक्षकार** |

**कोरमः-** १. वि. श. गुळवणी, अध्यक्ष
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी, अध्यक्ष ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर परिमंडळ खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

१) तक्रारदार- हे वि.प. यांचे उच्च दाब ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्र. २५०४९९०५३६०० असा आहे. त्यांनी दि. १४-०५-२०१५ रोजी अंतर्गत ग्राहक गा-हाणे निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे त्यांच्या व्यवसायाचा विद्युत पुरवठा Continuous supply (HT-IC) ऐवजी Non-continuous (HT-IN) करुन मिळणेबद्दल दिलेल्या अर्जावर कक्षाने दिलेल्या दि. ०१-०९-२०१५ च्या निर्णयावर समाधान झाले नसल्याने प्रस्तुत अपिल दाखल केले आहे.

२) वि.प. वितरण कंपनी यांनी असे लेखी व तोंडी कथन सुनावणीचे वेळी केले आहे की, सप्टेंबर २०१५ पासून तक्रारदारांच्या वीज बिलाची आकारणी Non-Continuous(HT-IN) प्रमाणे करणेत येत आहे. वि.प. तर्फे सप्टेंबर २०१५ व जुलै-२०१६ च्या वीज बिलांच्या सत्यप्रती दाखल केल्या आहेत.

३) या प्रकरणाची अंतिम सुनावणी दि. २३-०८-२०१६ रोजी ठेवणेत आली होती. तक्रारदार यांचेतर्फे कोणीही उपस्थित नव्हते. सुनावणी पुढे नेमण्यास कोणतेही कारण मंचापुढे आले नाही. वि.प. तर्फे कार्यकारी अभियंता श्री सागर मारुळकर उपस्थित होते. त्यांचे निवेदन ऐकणेत आले. सुनावणीचे दिवशी सदस्य सचिव श्री प्रदिप वि . खपली रजेवर असल्यामुळे हजर राहू शकले नाहीत.

४) उपलब्ध कादपत्रे व निवेदनाचा विचार करता खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) प्रस्तुत तक्रार निम्नलिखित परिस्थितीत निकाली काढणे योग्य होईल काय?
उत्तरः- होय
२) कोणता आदेश?
उत्तरः- खालील प्रमाणे

**<u>कारणमिमांसा</u>**

५) वितरण कंपनीतर्फे श्री मारुळकर यांनी निवेदन केले आहे की, तक्रारदार यांची मागणी सप्टेंबर २०१५ मध्येच मान्य करुन त्यांचा विद्युत पुरवठा Non - Continuous (HT-IN) असा करुन दिला असून त्यांना सप्टेंबर २०१५ पासून त्यानुसार वीज बिले पाठवणेत येत आहेत. श्री मारुळकर यांनी वीज बिलांच्या प्रती मंचापुढे सादर केल्या आहेत.

६) म्हणजे, या अपिलामध्ये तक्रारदार यांनी मंचाकडे केलेली मागणी अंदाजे एक वर्षापूर्वीच पूर्ण झालेचे दिसते. तक्रारदार यांची अन्य कोणतीही मागणी या प्रकरणात नाही. कदाचित, त्या कारणामुळे त्यांचेतर्फे कोणीही आज हजर राहिले नसावेत. सबब,प्रस्तुत प्रकरण निकाली काढणे योग्य होईल असे वाटते. म्हणून खालील प्रमाणे आदेश देणेत येतो.

## आदेश

१. तक्रारदार मे. शाहूराजे मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था गट क्र. २८६ माणगांववाडी , तिळवणी ता. हातकणंगले  जि. कोल्हापूर यांची या मंचाकडे केलेली तक्रार त्यांच्या तक्रार अर्जातील मागणी यापूर्वीच मान्य झाल्यामुळे निकाली काढणेत येत आहे.

२. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६  ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

सही/-
(वि. श. गुळवणी)
अध्यक्ष

सही/-
(श्री पी. एस. बुरांडे)
ग्राहक सदस्य